**प्रेसनोट दिनांक १९/०७/२०१९**

**कोथरूड पोलीस ठाणे पुणे शहर**

**दाखल गुन्हयातील अज्ञात आरोपींना २४ तासात पकडून अटक केलेबाबत**

दि. १४/०७/२०१९ रोजी फिर्यादी नामे लक्ष्मीकांत सुपेकर रा. किष्कींदानगर, सुतारदरा कोथरूड पुणे यांचे घरामध्ये ३ अज्ञात व्यक्तींनी जबरदस्तीने घूसून घराचा दरवाजा आतुन बंद करून फिर्यादीस हाताने व लाथा बुक्क्याने मारहाण करू लागले त्यावेळी फिर्यादीने प्रतिकार करणेचा प्रयत्न केला असता फिर्यादीचे डोक्यात घरातील सेटटॉप बॉक्स जोरात मारून फिर्यादीस जखमी केले. त्यानंतर फिर्यादीस कोयत्याचा धाक दाखवून फिर्यादीचे खिश्यातील सॅमसंग कंपनीचा मोबाईल व जवळील रू १८,०००/- एववढी रक्कम जबरदस्तीने काढून घेवून पळून गेले होते.वगैरे तक्रार फिर्यादीने समक्ष हजर राहून दिलेने कोथरूड पो ठाणे येथे गु र नं २४५/२०१९, भादवि कलम ३९२,३४२,३२३,५०४, ३४ सह आर्मस ॲक्ट कलम ४, २५ प्रमाणे दि. १७/०७/२०१९ रोजी रात्री २.३५ वा चे सुमारास गुन्हा दाखल केला आहे.

सपोनि बुआ, पोउनि कामठे, पोहवा जोरी, पोशि माटे, पोना काळे व पोशि पाडळे असे नमूद गुन्हयातील आरोपींचा हद्दीत शोध घेत असताना पोहवा जोरी यांना नमूद गुन्हयातील वर्णनाचे इसम हे सुतारदरा मोठया गणपतीचे मागील झाडीत बसल्याची माहीती मिळालेवरून नमूद ठिकाणी जावून नमूद इसमांचा शोध घेत असताना पोलीसांना पाहून ते ३ इसम झाडीतून सुतारदरामागील डोंगराकडे पळून जाऊ लागले. सदर ३ इसमांचा पाठलाग करून त्यांना पकडून ताब्यात घेवून पोलीस ठाणे येथे आणून त्यांचे नाव पत्ते विचारले असता त्यांनी १. राहूल नथू कंधारे वय ३२ वर्षे रा. स नं १०६, म्हतोबानगर झोपडपटटी, कोथरूड पुणे, २. स्वप्नील अकुंश उभे वय १९ वर्षे रा. सदर, व अजय विजय पायगुडे वय १८ वर्षे, रा. सदर अशी सांगितली. सपोनि बुआ व पोउनि कामठे यांनी त्यांच्याकडे दाखल गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता त्यांनी नमूद गुन्हा केल्याची कबुली दिलेवरून त्यांना दाखल गुन्हयात दि. १७/०७/२०१९ रोजी १६.३० वा अटक केली आहे. सदर आरोपी सध्या पोलीस कोठडीत आहेत.

अशा प्रकारे सपोनि बुआ, पोउनि कामठे, पोहवा जोरी, पोशि माटे, पोना काळे व पोशि पाडळे सर्व कोथरूड पोलीस ठाणे यांनी अज्ञात आरोपींची माहीती काढून त्याचा पाठलाग करून त्यांना ताब्यात घेवून दाखल गुन्हयात २४ तासाचे आतमध्ये अटक करून उत्तम कामगिरी केली आहे.

(प्रतिभा जोशी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोथरूड पोलीस ठाणे पुणे